# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 04 कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर महानगरपालिकामार्फत धडक कारवाई

दिनांक 29 जून 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 04 कार्यक्षेत्रामधील अनधिकृत बांधकामावर जेसिबी व मनुष्यबळाच्या सहाय्याने महानगरपालिकामार्फत कारवाई करण्यात आली. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करणेकामी निर्देशित करण्याच्या सूचना दिल्या आहे. त्या निर्देशानुसार प्रभागातील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत सीसीटीव्ही यंत्रणा स्मार्टपोल, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत हॉटेल/बार, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

दिनांक 29 जून 2024 रोजी प्रभाग समिती क्रमांक 04 कार्यक्षेत्रातील सोना लॉजिंग लेडीज बार येथे तळमजल्यावरील अनधिकृत वाढीव बांधकाम, ARL क्रेविंग लाउंज येथील टेरेसवरील अनधिकृत वाढीव बांधकाम, डिवाइन शीशा लाउंज येथील अनधिकृत वाढीव बांधकाम, फॉरेस्ट रूफटॉप येथील शेड या अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आली. सदर कारवाई मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे व उपायुक्त (अतिक्रमण) रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण, सहाय्यक आयुक्त प्रियांका भोसले, कनिष्ठ अभियंता व पोलिसांच्या उपस्थितीत करण्यात आली.